दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ✿ सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ ✿ वर्ष : १ ✿ अंक : १२४ ✿ पाने : ४ ✿ किंमत : ४ रू. ✿ Email : hinduprakashvarta@gmail.com ✿ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

### मंत्री पीयूष गोयल चार दिवसांच्या जपान दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल, 24 ते 27 ऑगस्ट 2026 या कालावधीत जपानला भेट देणार आहेत. या दौऱ्यात ते टोकियो, नागोया आणि ओसाका इथे जाणार असून, जपानला जाणाऱ्या भारताच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या व्यावसायिक शिष्टमंडळाचे ते नेतृत्व करत आहेत. या शिष्टमंडळात 200 हून अधिक व्यावसायिक प्रतिनिधींचा समावेश असून, त्यात उत्पादन, सेमी कंडक्टर, स्वच्छ ऊर्जा आणि पोलाद क्षेत्रापासून ते वाहन उद्योग, वित्तीय सेवा, आरोग्य सेवा आणि स्टार्टअप्स यांसारख्या विविध क्षेत्रांचा सहभाग आहे.

### हवेतच लॅपटॉपने घेतला पेट; विमानातील 5 प्रवासी जखमी

**नवी दिल्ली :** अमेरिकेत अटलांटा ते डॅलस असा प्रवास करणाऱ्या विमानात लॅपटॉपला अचानक आग लागल्याने मोठी खळबळ उडाली. विमान हवेत असतानाच केबिनच्या मागील भागात धूर आणि आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. या घटनेत पाच प्रवासी भाजल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना American Airlines Flight 2398 मध्ये घडली. विमानात १३३ प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते. विमान डॅलस फोर्ट वर्थ आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ पोहोचत असताना एका प्रवाशाच्या लॅपटॉपला अचानक आग लागली.

## फर्दापूरला ग्रीन सिटी' बनवणार मंत्री अतुल सावे आणि आ. सुहास शिरसाट यांचे जनतेला मोठे आश्वासन भाजपाच्या सभेत 'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता ने वेधले लक्ष

### पेपरची छपाई अन् बातम्या अतिशय दर्जेदार वाचून खूप आनंद झाला मंत्री अतुल सावे यांचे 'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता बद्दल गौरवोद्गार फर्दापूरच्या विकासावर मान्यवरांचा विश्वास

हिंदू प्रकाशवार्ता : शेख हक्कानी

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर येथील मुख्य चौकात भारतीय जनता पार्टीच्या वतीने नुकत्याच एका भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते या सभेत फर्दापूरच्या विकासाबाबत अत्यंत महत्त्वाच्या आणि सकारात्मक घोषणा करण्यात आल्या आहेत फर्दापूर गाव आगामी काळात एक ग्रीन सिटी म्हणून नावारूपाला येईल असा मोठा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला आहे

दिग्गज नेत्यांची मांदियाळी

या भव्य सभेला राज्याचे मंत्री मा. अतुल सावे माजी केंद्रीय मंत्री मा. रावसाहेब दानवे मा. आमदार सुहास शिरसाट आणि स्थानिक नेते इद्रिस मुलतानी यांची प्रमुख उपस्थिती होती. या नेत्यांच्या उपस्थितीमुळे सभेला मोठा उत्साह पाहायला मिळाला

**'दैनिक हिंदू प्रकाशवार्ता'वर मंत्र्यांची कौतुकाची थाप :** सभेदरम्यान एक अत्यंत लक्षवेधी प्रसंग घडला मंत्री अतुल सावे आणि आमदार सुहास शिरसाट यांना 'दैनिक हिंदू प्रकाश या वृत्तपत्राची प्रत देण्यात आली मंत्र्यांनी मंचावरच



यातील स्थानिक प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या बातम्यांचे मन पूर्वक आणि बारकाईने वाचन केले या वृत्तपत्राचे भरभरून कौतुक करताना मंत्री अतुल सावे म्हणाले या पेपरची छपाई अतिशय उत्कृष्ट असून यातील बातम्याही अत्यंत दर्जेदार आहेत हा पेपर वाचून मला खरोखरच खूप आनंद वाटला हे वृत्तपत्र अतिशय उत्तम आहे यानंतर जनतेला आश्वस्त करताना त्यांनी स्पष्ट केले की फर्दापूर गावाच्या ज्या काही समस्या 'हिंदू प्रकाश'ने मांडल्या आहेत त्या सर्व समस्या आता प्राधान्याने सोडवल्या जातील कोणताही प्रश्न प्रलंबित राहणार नाही

**फर्दापूर बनणार ग्रीन सिटी :** फर्दापूर हे जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांचे प्रवेशद्वार आहे याचा संदर्भ देत मान्यवरांनी खालील महत्त्वाचे मुद्दे मांडले. विकासाचे मॉडेल इद्रिस मुलतानी आणि पंचायत समिती सदस्य माहीम मुलतानी यांच्या कार्यकाळात फर्दापूर गाव 'ग्रीन सिटी' म्हणून उदयास येईल

पर्यटकांना भुरळ अजिंठा लेण्यांना भेट देण्यासाठी येणाऱ्या देश विदेशातील पर्यटकांना आता फर्दापूर गावही अतिसुंदर दिसेल

कायमस्वरूपी आठवणआम्ही कुठेतरी एका सुंदर आणि निसर्गरम्य गावाला भेट दिली अशी कायमस्वरूपी चांगली आठवण पर्यटक इथून घेऊन जातील असा विकास इथे घडवून आणला जाईल

मान्यवरांच्या या आश्वासनामुळे आणि 'दैनिक हिंदू प्रकाश'च्या दणदणीत वृत्तांतामुळे फर्दापूरकरांमध्ये विकासाची नवी आशा पल्लवित झाली असून आगामी वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे

## थोडक्यात वार्ता

### धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यात सामंजस्य करार करणार

**मुंबई :** राज्यभरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांची सोय व्हावी आणि त्यांना अधिक चांगल्या सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना मदत करणाऱ्या विविध धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मोठ्या रुग्णालयांमध्ये दररोज हजारो रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपचारासाठी येत असतात. बऱ्याचदा उपचाराचा मोठा खर्च, राहण्याची आणि जेवणाची सोय तसेच योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. हीच बाब लक्षात घेऊन या सर्व घटकांना एकाच छताखाली आणून एक सुटसुटीत आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### भिवंडीत 65 वर्षीय नागरिकाचा बेदम मारहाणीत मृत्यू

**भिवंडी :** भिवंडीतील ठाणे रोड परिसरात, रोज घराबाहेर बसून धिंगाणा घालणाऱ्यांना हटकण्याची मोठी किंमत एका कुटंबाला मोजावी लागली. वाद विकोपाला गेल्यानंतर झालेल्या झटापटीत ६५ वर्षीय जमीर अहमद मोहम्मद कासिम यांचा मृत्यू झाला. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात रेकॉर्ड झाली आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या घटनेप्रकरणी पोलिसांनी दोन तरुणांना ताब्यात घेतले आहे. दररोज आठ ते दहा जण जमीर अहमद मोहम्मद कासिम यांच्या घराबाहेरच्या परिसरात मोबाईलचा आवाज वाढवून मोठ्या आवाजात बोलत बसायचे अथवा व्हिडीओ बघत - ऐकत बसायचे. मुद्दाम मोठ्या आवाजात गप्पा मारत बसायचे. या त्रासाला वैतागून जमीर अहमद मोहम्मद कासिम यांनी त्रास देणाऱ्यांना हटकले. यावरून वाद झाला. थोड्याच वेळात वाद विकोपाला गेला आणि मोठ्या आवाजात धिंगाणा घालणाऱ्यांनी जमीर अहमद मोहम्मद कासिम यांना बेदम चोपले. मारहाण असह्य झाली आणि जमीर अहमद मोहम्मद कासिम यांचा मृत्यू झाला. स्थानिक सीसीटीव्ही फूटेजमध्ये अनेकजण मारहाण करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. मारहाण करणाऱ्यांनी जमीर अहमद मोहम्मद कासिम यांना बेदम चोपले. जमीर अहमद मोहम्मद कासिम यांना पोटात आणि कमरेखाली लाथा मारण्यात आल्या. या मारहाणीत जमीर अहमद मोहम्मद कासिम गंभीर जखमी झाले. कुटुंबीयांनी आणि स्थानिकांनी त्यांना तात्काळ एका खासगी रुग्णालयात दाखल केले, जिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### नेस्ले, पेप्सिको आणि कोका-कोलासह भ्रामक जाहिरातींवर नोटिस

**नवी दिल्ली :** नेस्ले, पेप्सिको आणि कोका-कोलासारख्या मोठ्या खाद्य कंपन्यांविरोधात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (FSSAI) कारवाईचा बडगा उगारला आहे. गेल्या काही महिन्यांत FSSAIने खाद्य कंपन्यांविरोधात मोठी मोहीम राबवत १५० हून अधिक नोटिसा बजावल्या आहेत. कथित भ्रामक जाहिराती, चुकीचे दावे आणि लेबलिंग नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. FSSAIने शनिवारी आपल्या कारवाईची माहिती देताना अनेक मोठ्या कंपन्यांचा उल्लेख केला. त्यामुळे आता खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील माहिती, लेबलिंग तसेच जाहिरातींमधून केले जाणारे दावे यावर नियामकाची नजर अधिक कडक झाली आहे. ग्राहकांपर्यंत अचूक आणि नियमांनुसार माहिती पोहोचवणे हा या कारवाईचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे.

## कालीमठ ट्रस्टची नऊ वर्षे जुनी 'स्कीम' रद्दच

### सहधर्मादाय आयुक्तांचा निर्णय उच्च न्यायालयाकडून कायम; विश्वस्तांची याचिका फेटाळली

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कन्नड तालुक्यातील उपळा येथील श्री कालीमठ सार्वजनिक ट्रस्टच्या व्यवस्थापनासाठी २०१४ मध्ये मंजूर करण्यात आलेली नवीन नियमावली (स्कीम) रद्द करण्याचा सहधर्मादाय आयुक्तांचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने कायम ठेवला आहे. न्यायमूर्ती अजित कडेठाणकर यांनी ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजी रंगनाथ सोनवणे यांच्यासह आठ विश्वस्तांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. त्यामुळे नऊ वर्षांपूर्वी मंजूर झालेली नियमावली रद्दच राहणार आहे.

उपळा येथील श्री कालीमठ सार्वजनिक ट्रस्टची ६ जून १९८८ रोजी नोंदणी झाली होती. ट्रस्टच्या व्यवस्थापनासाठी २०१३ मध्ये अध्यक्ष शिवाजी सोनवणे व अन्य विश्वस्तांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे चौकशी अर्ज दाखल करून नवीन नियमावली मंजूर करण्याची मागणी केली होती. त्यानुसार २७ जानेवारी २०१४ रोजी नवीन स्कीमला मंजुरी देण्यात आली.

या निर्णयाला आक्षेप घेत माजी विश्वस्त राजपालसिंग भोज ऊर्फ राजू महाराज यांनी २०२३ मध्ये सहधर्मादाय आयुक्तांकडे पुनर्विलोकन अर्ज दाखल केला. नवीन स्कीम मंजूर करताना कायद्यातील अनिवार्य प्रक्रिया पाळण्यात आली नाही, जुन्या विश्वस्त व सदस्यांना डावलण्यात आले तसेच सार्वजनिक नोटीसही देण्यात आली नाही, असा दावा त्यांनी केला होता. या अर्जावर सुनावणी घेत सहधर्मादाय आयुक्तांनी २६ जुलै २०२४ रोजी अर्ज मंजूर करून २०१४ मध्ये मंजूर झालेला स्कीमचा आदेश रद्द केला.

या निर्णयाविरोधात विद्यमान विश्वस्तांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, मूळ आदेश देताना कायदेशीर प्रक्रिया डावलली गेली असल्यास केवळ नऊ वर्षांचा विलंब झाला म्हणून तो आदेश कायम ठेवता येणार नाही. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील कलम ७०-अन्वये सहधर्मादाय आयुक्तांना कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाची वैधता तपासण्याचा अधिकार असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

**न्यायालयाची महत्त्वाची निरीक्षणे :** नऊ वर्षांचा विलंब हा मूळ आदेशातील बेकायदेशीरतेचे समर्थन ठरू शकत नाही. राजीनामा दिला असला तरी ट्रस्टच्या हिताशी संबंधित व्यक्तीला कायद्यानुसार 'हितसंबंधी व्यक्ती' मानले जाऊ शकते. नवीन स्कीम मंजूर करताना सार्वजनिक नोटीस तसेच सदस्यांना आवश्यक पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आले. विश्वस्तांतर्फे ॲड. राहुल जोशी व ॲड. रविराज वाकळे यांनी राजू महाराज यांनी राजीनामा दिल्याने ते हितसंबंधी व्यक्ती राहिले नसल्याचा युक्तिवाद केला. तर राजू महाराज यांच्यातर्फे ॲड. माधवेश्वरी म्हसे व ॲड. प्रवीण कवडे यांनी नवीन स्कीम मंजूर करताना सदस्यांचे कायदेशीर हक्क डावलण्यात आल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

अखेर न्यायालयाने सहधर्मादाय आयुक्तांचा निर्णय कायम ठेवत विश्वस्तांची याचिका फेटाळली. निकालानंतर विश्वस्तांनी मागितलेली स्थगितीची विनंतीही न्यायालयाने नामंजूर केली.

## जपानमध्ये 5.9 रिश्टर स्केलचा भूकंप, अनेक जखमी

**टोकियो :** जपानमध्ये रविवारी मध्यरात्री दोन वाजता कांटो प्रदेशात ५.९ रिश्टर स्केलच्या भूकंपाची नोंद झाली. टोकियोच्या अदाची वॉर्डमध्ये आणि इबाराकी, सैतामा तसेच चिबा प्रांतांमधील काही नगरपालिकांमध्ये भूकंपाची तीव्रता ५ पेक्षा कमी नोंदवली गेली. भूकंपाचा केंद्रबिंदू दक्षिण इबाराकी प्रांतात ७० किलोमीटर खोलीवर होता. या भूकंपानंतर त्सूनामीचा इशारा देण्यात आलेला नाही. पण मध्यरात्री झालेल्या भूकंपामुळे किमान ३७ नागरिक जखमी झाले.

भूकंपामुळे पडझड झाल्याची आणि काही नागरिक जखमी झाल्याची माहिती मिळताच प्रशासन सतर्क झाले. तातडीने घटनास्थळी मदत पाठवण्यात आली. टोकियोमध्ये १५, सैतामामध्ये नऊ, कानागावामध्ये आठ, चिबामध्ये चार आणि इबाराकीमध्ये एक जण जखमी झाले.

ज्यावेळी भूकंप झाला त्यावेळी अनेकजण गाढ झोपेत होते. जमीन हादरत असल्याचे जाणवताच गाढ झोपेतून घाबरून उठल्यामुळे काही जण बेडवरून पडले आणि जखमी झाले. तर काही जण झोपेतून उठताना भिंत किंवा फर्निचरला धडकले आणि जखमी झाले, असे स्थानिक प्रशासनाने सांगितले.

कानागावा प्रांतातील योकोहामा येथे ८० वर्षांचा महिलेला पलंगावरून पडल्यामुळे कमरेला गंभीर दुखापत झाली.

## महाराष्ट्राची परंपरा लाभलेल्या ढोल ताशाला जागतिक नामांकन

**नागपूर :** शिक्षण कौशल्य, क्रीडा स्टार्टअप आदी क्षेत्रात युवा पिढीचा सकारात्मक सहभाग आहे. त्यांचा हा सहभाग वाढविण्यासोबतच संपूर्ण मदत देण्यात येईल त्यासोबत स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये चर्चा करून चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी दिली. रेशीमबाग मैदानावर मंथन फॉर युवा या उपक्रमांतर्गत ढोल ताशा पथकाचा जागतिक विक्रम तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन असलेल्या व्यक्तींसोबत थेट संवाद, नशामुक्त महाराष्ट्र व देश यासाठी युवकांना शपथ आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 25 हजार पेक्षा जास्त युवक व युवती सहभागी झाल्या होत्या.

महाराष्ट्राची परंपरा असलेल्या ढोल ताशा पथकाने इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या मध्ये जागतिक विक्रम नोंदविला आहे. आधार नोंद असलेल्या 585 ध्वजधारकांच्या या उपक्रमामुळे जागतिक विक्रमाची नोंद झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वविक्रम केल्याबद्दल संपूर्ण चमुचे अभिनंदन केले. 25 हजार पेक्षा जास्त युवकांच्या साक्षीने हा उपक्रम पूर्ण झाला असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजची युवा पिढी सर्वच क्षेत्रात आपल्या कौशल्याने नावलौकिक मिळवित आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सर्वाधिक सहभाग लाभलेल्या ध्वजधारकांच्या समावेशाबद्दल विश्वविक्रमामध्ये नोंद झाली असून यापूर्वी 260 ध्वज धारकांचा समावेश असलेला विक्रम आज मोडीत निघाला आहे. सुप्रसिद्ध क्रीडा समालोचक रिधिमा पाठक यांनी युवकांचे आयकॉन असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच क्रिकेटपटू तिलक वर्मा, राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक विजेते दिलीप महादू गावित, अर्जुन देशपांडे, किरण शहाजी यांचे सोबत संवाद साधताना विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्याची प्रेरणा व अनुभव युवकांसमोर शेअर केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की संविधानामुळेच लोकशाही प्रगल्भ झाली आहे. आपल्या लोकशाहीमुळेच मला नगरसेवक, महापौर, आमदार आणि मुख्यमंत्री या पदापर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. आपल्या आकांक्षा व विश्वास पूर्ण करण्यासाठी संविधानामुळेच कुणीही थांबू शकत नाही असे सांगत त्यांनी आपल्या राजकीय व सामाजिक वाटचालीची माहिती युवकांसमोर मांडली.

## श्रावणाच्या शनिवारी श्री भद्रा मारुती दर्शनासाठी लाखोभाविकांची उपस्थिती; जय भद्राच्या गजराने दुमदुमला मंदिर परिसर

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद प्रतिनिधी :** खुलताबाद २२ ऑगस्ट पासून श्रावणातील दुसरा शनिवारी भद्रा हनुमान की जय. सियावर रामचंद्र की जय ज्या जय जयकारात पायी दिंड्या. मोठ्या प्रमाणात भाविक भक्त या ठिकाणी मोठ्या संख्येने येत असतात महाराष्ट्र भरातून भाविक मोठ्या प्रमाणात येतात ( भद्रा मारुतीची मूर्ती १०१ किलो फुलांच्या साह्याने आरशाने मनमोहक पद्धतीने सजवण्यात आली होती )





आलेल्या भाविकांना या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भंडारा महाप्रसा साबुदाणा खिचडी ११ कुंटलची भक्तांसाठी करण्यात आली होती. आयोजन भाविकांच्या वतीने करण्यात येते. तसेच इतर दिवस श्रावण महिन्यात भाविकांची मोठी गर्दी असते यासाठी महाराष्ट्र भरातून भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्थांच्या वतीने प्रामुख्याने लक्ष देऊन भाविकांचे सुरळीत दर्शन व्हावे यासाठी सुरक्षिततेसह सुविधांवर विशेष भर;व छत्रपती संभाजीनगर–खुलताबाद मार्गावर जादा बसफेऱ्यांची व्यवस्था

व श्री भद्रा मारुती संस्थान व प्रशासनाच्या वतीने भाविकांच्या सुरक्षिततेसह विविध सोयी-सुविधां उपलब्ध करून देण्यात आले आहे

भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, कडेकोट सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. तसेच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ऊन व पावसाचा त्रास होऊ नये, यासाठी मंदिर परिसरात भव्य मंडप शेड उभारण्यात आले आहे.

श्रावणातील प्रत्येक शनिवारी भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने दर्शन प्रक्रिया सुलभ व सुरळीत पार पडावी, तसेच भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. सुरक्षा, दर्शन व्यवस्था, पिण्याचे पाणी, निवारा यांसह ॲम्बुलन्स आवश्यक सुविधांकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

याबाबत श्री भद्रा मारुती संस्थानचे अध्यक्ष मिटू पाटील बारगळ मंत्री अतुल सावे माजी खासदार चंद्रकांत खैरे व जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांच्यासह संस्थांचे सर्व पदाधिकारी नियोजन करत आहे. खुलताबाद पोलीस प्रशासनाच्या वतीने कुठल्या अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात चोक बंदोबस्त ठेवण्यात आला

## शिवना येथे मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट; शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण

### शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागे धावतात कुत्रे; ग्रामपंचायतीने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना गावात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढल्याने नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः जिल्हा परिषद शाळा आणि सलीम उर्दू हायस्कूलमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागे मोकाट कुत्रे धावत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुले घाबरून पळत असल्याने एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



गावातील मुख्य रस्ते, गल्लीबोळ, शाळांच्या परिसरासह विविध ठिकाणी मोकाट कुत्र्यांचे टोळके फिरताना दिसत आहेत. सकाळी विद्यार्थी शाळेत जात असताना तसेच शाळा सुटल्यानंतर घरी परतताना कुत्रे त्यांच्या मागे धावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे पालकांमध्येही आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाढली आहे.

मोकाट कुत्र्यांच्या टोळक्यांमुळे केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी तसेच दुचाकीस्वारांनाही त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळीही कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

**विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

**जिल्हा परिषद शाळा आणि सलीम उर्दू हायस्कूलमध्ये परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दररोज पायी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोकाट कुत्र्यांचा सामना करावा लागत आहे. काही विद्यार्थी कुत्र्यांच्या भीतीने रस्त्यावरून धावत सुटतात. अशावेळी वाहनांची वर्दळ असल्याने अपघात होण्याचीही शक्यता आहे.**

पाळीव कुत्र्यांनाही मोकळे सोडले जाते

मोकाट कुत्र्यांसोबतच काही नागरिकांकडून पाळीव कुत्र्यांनाही सार्वजनिक ठिकाणी मोकळे सोडले जात असल्याने समस्या आणखी वाढत आहे. पाळीव कुत्र्यांच्या मालकांनी आपल्या कुत्र्यांना घराबाहेर मोकळे सोडू नये आणि त्यांची योग्य काळजी घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

ग्रामपंचायतीने तातडीने उपाययोजना करावी

एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर ठोस उपाय करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीने तातडीने बैठक घेऊन मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी संबंधित विभागाच्या मदतीने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच शाळांच्या परिसरात विशेष लक्ष देऊन विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न लक्षात घेता ग्रामपंचायतीने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन ठोस निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

### "शाल जोडे"



# सं पा द की य

## युवा शक्ती, संस्कृतीचा गौरव आणि व्यसनमुक्तीचा संकल्प

नागपुरातील रेशीमबाग मैदानावर पार पडलेला 'मंथन फॉर युवा' हा उपक्रम महाराष्ट्रातील युवा पिढीच्या सकारात्मक ऊर्जेचे आणि सामाजिक जबाबदारीचे दर्शन घडवणारा ठरला आहे. शिक्षण, कौशल्य विकास, क्रीडा आणि स्टार्टअप्स यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्ये युवकांचा वाढता सहभाग हा देशाच्या प्रगतीचा मुख्य आधार आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने २५ हजारांहून अधिक तरुण-तरुणींनी एकत्र येत ढोल-ताशा पथकाचा जागतिक विक्रम रचणे आणि एकाच व्यासपीठावरून व्यसनमुक्तीची शपथ घेणे, ही महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची नांदी आहे. महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा जपणाऱ्या ५८५ ध्वजधारकांनी 'इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' आणि 'एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंदवलेला विश्वविक्रम हा युवा शक्तीच्या शिस्तबद्धतेचा आणि समर्पणाचा पुरावा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रसंगी व्यक्त केलेले विचार आणि दिलेली ग्वाही अत्यंत महत्त्वाची आहे. संविधानाने दिलेल्या लोकशाही मूल्यांमुळेच तळागाळातील व्यक्तीला सर्वोच्च पदापर्यंत पोहोचणे शक्य होते, हा त्यांनी मांडलेला विचार युवकांसाठी प्रेरणादायी आहे. राज्यात स्टार्टअप्ससाठी १०० टक्के मदत देणारे अधिक मजबूत धोरण (इकोसिस्टीम पॉलिसी) तयार करण्याची दिलेली ग्वाही नवउद्योजकांना मोठे बळ देईल. याशिवाय, आजच्या डिजिटल युगात मुलांमधील वाढता 'स्क्रीन टाईम' ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली असून, मुलांना स्क्रीनवरून पुन्हा क्रीडांगणाकडे वळवण्यासाठी धोरण आखण्याचा मुख्यमंत्र्यांचा विचार अत्यंत काळाच्या पुढचा आहे. पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या उपस्थितीत २५ हजार युवकांनी घेतलेली 'नशामुक्त भारत'ची शपथ ही अमली पदार्थमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेली मोठी जनजागृती आहे. संस्कृतीचा अभिमान, तंत्रज्ञानाची साथ, व्यसनमुक्तीचा संकल्प आणि खेळाची आवड असा चौफेर मेळ घालणारी युवा पिढीच महाराष्ट्राला आणि देशाला नव्या शिखरावर नेऊ शकते. शासनाने दिलेले हे पाठबळ आणि युवकांचा हा उत्साह भविष्यातील समृद्ध भारताची पायाभरणी करेल, यात शंका नाही.

# कन्नड-चाळीसगाव घाटात 'लालपरी' दरीत कोसळता कोसळता वाचली!

## स्टेअरिंग रॉड तुटल्याने 49 प्रवाशांचा जीव टांगणीला; पाईपचा आधार ठरला जीवदान, क्रेनच्या साहाय्याने बस बाजूला

**कन्नड :** कन्नड-चाळीसगाव घाटात छत्रपती संभाजीनगरहून सुरतकडे जाणारी राज्य परिवहन महामंडळाची 'लालपरी' दरीत कोसळता कोसळता वाचली. एमएच-४० एन-९७२६ क्रमांकाची, छत्रपती संभाजीनगर सिडको आगाराची ही एसटी बस दुपारी १२ ते १२.३० वाजेच्या सुमारास घाटातून जात असताना अचानक स्टेअरिंग रॉड तुटल्याने रस्त्याच्या कडेला जाऊन दरीच्या दिशेने झुकली. बसमध्ये तब्बल ४९ प्रवासी असल्याने काही काळ प्रवाशांचा जीव टांगणीला लागला होता.



बस रस्त्याच्या कडेला गेल्यानंतर तिचा मोठा भाग सुमारे १०० ते १५० फूट खोल दरीच्या दिशेने झुकला. मात्र रस्त्याच्या कडेला असलेल्या पाईपचा आधार मिळाल्याने बस पुढे सरकली नाही आणि मोठा अनर्थ टळला. काही क्षणांचा हा प्रसंग प्रवाशांसाठी अक्षरशः काळजाचा ठोका चुकवणारा ठरला.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. बसस्थानक प्रमुख संघर्ष पगारे, वाहतूक निरीक्षक सागर पाटील आणि प्रभारक बालाजी टोटवाड यांनीही तातडीने घटनास्थळी दाखल होत परिस्थितीची पाहणी केली. चाळीसगाव पोलिसदेखील घटनास्थळी दाखल झाले होते.

बस दरीच्या कडेला धोकादायक स्थितीत अडकल्याने ती बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. अखेर क्रेनच्या साहाय्याने एसटी बसला सुरक्षितपणे बाजूला करण्यात आले. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या संकटातून बाहेर काढण्यात यश आले. ४९ प्रवाशांना घेऊन धावणाऱ्या बसची नियमित तांत्रिक तपासणी केली जाते का? लांब पल्ल्याच्या मार्गावर पाठवण्यापूर्वी बसची सुरक्षितता तपासली जाते का? या प्रश्नांची उत्तरे आता एसटी महामंडळाकडून मिळणे गरजेचे आहे.

आज रस्त्याच्या कडेला असलेल्या एका पाईपचा आधार मिळाला म्हणून ४९ प्रवाशांचे जीव वाचले. मात्र हा आधार नसता तर बस थेट खोल दरीत कोसळण्याची शक्यता होती.

कन्नड-चाळीसगाव घाटातील या घटनेने एसटी बसच्या तांत्रिक तपासणीसोबतच घाटातील सुरक्षाव्यवस्थेचाही प्रश्न उपस्थित केला आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी संबंधित यंत्रणांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याची गरज आहे.

### लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी अशाच बस का?

**या घटनेनंतर राज्य परिवहन महामंडळाच्या लांब पल्ल्याच्या मार्गांवर धावणाऱ्या बसच्या तांत्रिक स्थितीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. छत्रपती संभाजीनगर ते सुरतसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गावर धावणाऱ्या बसमध्ये स्टेअरिंग रॉडसारखा महत्त्वाचा भाग तुटणे ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज आहे.**

# भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेनसाठी 16 चालकांची नियुक्ती; जपानमध्ये वर्षभर विशेष प्रशिक्षण

**मुंबई :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या संचालनासाठी मनुष्यबळाची तयारी वेगाने सुरू झाली आहे. नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (NHSRCL) प्रकल्पासाठी १६ हायस्पीड रेल्वे चालकांची नियुक्ती केली असून, या सर्व चालकांना जपानमध्ये एक वर्षाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. जपानी शिंकान्सेन तंत्रज्ञानावर आधारित या प्रकल्पासाठी चालकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबतच सुरक्षा मानके आणि कार्यपद्धतीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाची लांबी ५०८ किलोमीटर असून, गुजरातमधील वापी ते साबरमती हा टप्पा डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तर मुंबई ते साबरमती संपूर्ण मार्ग डिसेंबर २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. रेल्वे रूळ, विद्युतीकरण, सिग्नलिंग, दूरसंचार आणि इतर पायाभूत सुविधांची कामे पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या संचालनाची अचूक वेळ निश्चित केली जाणार आहे.




**चालकांना विशेष वेतनश्रेणी :** नियुक्त करण्यात आलेल्या बुलेट ट्रेन चालकांचा समावेश अ-कार्यकारी (NE)-४ श्रेणीत करण्यात आला आहे. त्यांना ४० हजार ते १.२५ लाख रुपयांची औद्योगिक महागाई भत्ता (IDA) वेतनश्रेणी लागू आहे. याशिवाय NHSRCLच्या नियमांनुसार विविध भत्ते आणि इतर सुविधाही मिळणार आहेत.

**२६० कर्मचाऱ्यांना जपानी भाषेचे प्रशिक्षण :** प्रकल्पासाठी केवळ चालकांनाच प्रशिक्षण दिले जात नसून इतर कर्मचाऱ्यांनाही जपानी कार्यपद्धती आणि संस्कृतीशी परिचित करून दिले जात आहे. आतापर्यंत सुमारे २६० कर्मचाऱ्यांनी मूलभूत जपानी भाषा आणि संस्कृतीचे प्रशिक्षण घेतले आहे. तसेच NHSRCLच्या अनेक अधिकाऱ्यांनी जपानी भाषा प्रावीण्य परीक्षा (JLPT) उत्तीर्ण करून N1 ते N5 स्तरांपर्यंतची प्रमाणपत्रे मिळवली आहेत.

**५०८ किमी मार्गावर तीन आगार :** बुलेट ट्रेनच्या रेकची नियमित तपासणी, देखभाल आणि दुरुस्तीसाठी ठाणे, सुरत आणि साबरमती येथे आगार उभारण्यात येत आहेत. या आगारांमध्ये आपत्कालीन देखभाल, रेकची दुरुस्ती, री-प्रोफाइलिंग तसेच उपकरणे आणि बोगींच्या देखभालीसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध असतील. साबरमती येथील रोलिंग स्टॉक आगारात हलकी तसेच मोठी देखभाल करण्याची सुविधा असेल. सुरुवातीला चार तपासणी मार्गिका आणि दहा देखभाल-दुरुस्ती मार्गिका उभारल्या जाणार आहेत. प्रवासी सेवा वाढल्यानंतर तपासणी मार्गिका आठ आणि देखभाल-दुरुस्ती मार्गिका २१ करण्याची तरतूद करण्यात आली आहे. भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनसाठी पायाभूत सुविधांसोबतच प्रशिक्षित चालक आणि तांत्रिक मनुष्यबळाची तयारी सुरू झाल्याने प्रकल्पाच्या संचालनाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

# संरक्षण उत्पादनात भारताची झेप; स्वदेशी AK-203 रायफलची यशस्वी निर्मिती

नवी दिल्ली : स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रात भारताने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत अमेठीतील कोरवा आयुध निर्मिती प्रकल्पात पहिली १०० टक्के स्वदेशी AK-203 असॉल्ट रायफल यशस्वीपणे तयार करण्यात आली असून तिची प्राथमिक चाचणीही घेण्यात आली आहे. या रायफलला 'शेर' असे नाव देण्यात आले आहे.




AK-203 रायफल्सच्या स्थानिक उत्पादनासाठी भारत आणि रशियाने २०१९ मध्ये स्थापन केलेल्या इंडो-रशियन रायफल्स प्रायव्हेट लिमिटेडने (IRRPL) ही कामगिरी केली आहे. IRRPLचे CEO आणि MD मेजर जनरल एस. के. शर्मा यांनी याबाबत माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, 'शेर' रायफलमधील प्रत्येक घटक आणि कच्चा माल भारतीय उद्योगातूनच मिळवण्यात आला आहे. त्यामुळे हे केवळ काही भागांचे स्थानिकीकरण नसून रायफलचे संपूर्ण स्वदेशीकरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बर्स्ट फायरिंगसह चाचणी यशस्वी

पहिल्या १०० टक्के स्वदेशी AK-203 'शेर'ची बर्स्ट फायरिंगसह चाचणी घेण्यात आली असून, प्राथमिक निकाल उत्साहवर्धक असल्याचे IRRPLने सांगितले आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये भारतीय लष्कराच्या चाचण्यांसाठी १०० टक्के स्वदेशी प्रोटोटाइप तयार करण्याचे काम सुरू आहे.

दर १०० सेकंदाला एक रायफल तयार करण्याचे लक्ष्य

उत्पादन क्षमता वाढवण्याच्या दिशेनेही IRRPL वेगाने काम करत आहे. लवकरच दर १०० सेकंदाला एक AK-203 'शेर' तयार करण्याच्या उत्पादन दराकडे वाटचाल करण्याचे कंपनीचे लक्ष्य आहे. क्षमता वाढ, स्वदेशीकरण आणि उत्पादन प्रक्रियेच्या अनुकूलनामुळे भारतीय लष्कराला सुमारे ६ लाख रायफल्सचा पुरवठा जवळपास एक वर्ष आधी करता येणार असल्याचेही IRRPLकडून सांगण्यात आले आहे.

जुन्या INSAS रायफल्सची जागा घेणार

AK-203 ही ७.६२x३९ मिमी क्षमतेची आधुनिक असॉल्ट रायफल असून ती कलाशनिकोव्ह प्लॅटफॉर्मवर आधारित आहे. आधुनिक एर्गोनॉमिक्स, मॉड्यूलर ॲक्सेसरी रेल्स आणि लक्ष्यभेदन क्षमतेसह ही रायफल भारतीय लष्कराच्या गरजांनुसार विकसित करण्यात आली आहे. जुन्या होत चाललेल्या INSAS रायफल्सच्या जागी भारतीय लष्करात ६ लाखांहून अधिक स्थानिक बनावटीच्या AK-203 रायफल्स दाखल करण्याची योजना आहे.

अमेठीत १०० टक्के स्वदेशी AK-203च्या निर्मितीमुळे भारताच्या संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरतेला आणखी बळ मिळाले असून, देशांतर्गत संरक्षण उद्योगासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# मेहगाव येथे अवैध वृक्षतोडीच्या लाकडाची विनापरवाना वाहतूक; ट्रॅक्टर ताब्यात

## पिशोर-कन्नड मार्गावर वन विभागाची कारवाई



**कन्नड :** दि.२३ ऑगस्ट - पिशोर-कन्नड रोडवरील मौजे मेहगाव येथे अवैध वृक्षतोडीचा मुद्देमाल विनापरवाना वाहतूक करणारा विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर वन विभागाच्या पथकाने ताब्यात घेतला. ही कारवाई दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी करण्यात आली.

वन विभागाच्या पथकाला मेहगाव येथे एक विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर शिरस प्रजातीच्या अवैध वृक्षतोडीचा मुद्देमाल भरून विनापरवाना वाहतूक करताना आढळून आला. पथकाने ट्रॅक्टर ताब्यात घेत त्याविरोधात वनगुन्हा नोंदविला. ही कारवाई उपवनसंरक्षक सुवर्णा माने, सहायक वनसंरक्षक विशाल कवडे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड शिवाजी टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही कारवाई वनपाल पिशोर रफिक पठाण, वनरक्षक कृष्ण माळी, वनरक्षक बाळू चव्हाण आणि वनरक्षक अश्विनी लांडे यांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास वनपाल रफिक पठाण करीत आहेत.

# मक्रनपूर पुलाजवळ दुचाकी घसरून 35 वर्षीय व्यक्ती गंभीर जखमी

**कन्नड** :दि.२३ ऑगस्ट - शहरालगत असलेल्या मक्रनपूर पुलाजवळ दि. २२ रोजी रात्री १० ते १०.३० वाजेच्या सुमारास दुचाकी घसरून झालेल्या अपघातात राजू गुलाब चव्हाण (वय ३५, रा. विजयनगर, छत्रपती संभाजीनगर) हे गंभीर जखमी झाले.




राजू चव्हाण हे नातेवाइकांना भेटण्यासाठी कन्नड परिसरात आले होते. नातेवाइकांची भेट घेतल्यानंतर ते दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगर येथील आपल्या घराच्या दिशेने परतत होते. मक्रनपूर पुलाजवळून जात असताना त्यांची दुचाकी अचानक घसरल्याने ते रस्त्यावर पडले. या अपघातात त्यांच्या शरीराला गंभीर दुखापत झाली.

अपघाताची माहिती मिळताच रात्र गस्तीवर असलेले पोलीस हेडकॉन्स्टेबल राजकुमार कुकलारे आणि पोलीस अंमलदार विशाल लोंढे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी अवस्थेतील राजू चव्हाण यांना तातडीने कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण पवार यांनी जखमीची तपासणी केली. प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

# यशोदाबाई हजारी; आज अंत्ययात्रा



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२३ ऑगस्ट :** येथील यशोदाबाई पदमसिंह हजारी (वय.८७)यांचे दि.२३ रविवार रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्यावर सोमवार रोजी सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा परिवार होत.जयराजसिंह हजारी यांच्या त्या मातोश्री होत.

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. 2026/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-91 दिनांक- 10-07-2026
अर्जदार ०:- बाळा तुकाराम दवंगे रा.शफेपूर पिशोर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर
विरूध्द
गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कनड / ता. कन्नड जि. छ.संभाजीनगर
विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचे स्वतः बाळा तुकाराम देवंगे चा जन्म दिनांक 01-01-1968 रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचे स्वतः चा जन्म दिनांक 01-01-1968 रोजी पिशोर ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचे स्वतः बाळा तुकाराम दवंगे यांचा जन्म दिनांक 01-01-1968 रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 19-08-2026 रोजी मा.न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 01-01-1968 रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ....../07/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

# फर्दापूरमध्ये विकासाचा महाडोस संत सेवालाल महाराज स्मारकास मंजुरी तांडा वस्तीसाठी 2 कोटींचा निधी : मंत्री अतुल सावे

## 25 वर्षांत आमदारांनी काहीच विकास केला नाही आता खोटे श्रेय लाटण्यासाठी धडपड, नाव न घेता घणाघात फर्दापूर पाणीपुरवठा व रस्ते कामांचा मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ

**फर्दापूर :** फर्दापूर येथे विविध विकासकामांचा आणि भारतीय जनता पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ राज्याचे इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते अत्यंत दिमाखात संपन्न झाला यावेळी भाजप नेत्यांनी फर्दापूरच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीची घोषणा करत विकासकामांचा धडाका लावला तर दुसरीकडे विद्यमान आमदारांच्या कार्यपद्धतीवर जोरदार हल्लाबोलही केला

या भव्य कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष आ. सुहास शिरसाट आणि राज्यमंत्री दर्जा प्राप्त नेते इद्रिस मुलतानी यांची प्रमुख उपस्थिती होती



मंत्री अतुल सावे यांच्या मोठ्या घोषणा

अतुल सावे यांनी जनतेला संबोधित करताना स्पष्ट केले की फर्दापूर जिल्हा परिषद गटातील विकासकामांसाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही

संत सेवालाल महाराज स्मारक बंजारा समाजाची अनेक वर्षांची प्रलंबित मागणी पूर्ण करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून संत सेवालाल महाराज यांच्या स्मारकाला राज्य शासनाकडून लवकरच मंजुरी दिली जाईल अशी मोठी घोषणा त्यांनी केली

२ कोटींचा निधी यासोबतच तांडा वस्ती निधीतून फर्दापूर जिल्हा परिषद सर्कलला तब्बल दोन कोटी रुपये देण्याची घोषणाही मंत्री सावे यांनी केली तसेचकेवळ सहा महिन्यांत इद्रिस मुलतानी यांनी मतदारसंघात केलेल्या विविध विकासकामांबद्दल त्यांची प्रशंसा केली

रावसाहेब दानवे यांचा सत्तारांना टोला

माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी आपल्या भाषणात छत्रपती संभाजीनगर-जळगाव आणि बुलढाणा हायवे तसेच ३३ KV सबस्टेशन व धरणांच्या कामांचा आवर्जून उल्लेख केला. नाव न घेता आ. अब्दुल सत्तार यांना लक्ष करत गेल्या २५ वर्षांमध्ये यांनी नेमका काय विकास केला असा थेट सवाल दानवे यांनी ग्रामस्थांना विचारला

मेघनाताई बोर्डीकर यांची व्हर्च्युअल' उपस्थिती अन् निधीची खैरात

ऊर्जा आरोग्य व पाणीपुरवठा मंत्री मेघनाताई बोर्डीकर या काही कारणास्तव प्रत्यक्ष उपस्थित राहू शकल्या नाहीत मात्र त्यांनी भ्रमणध्वनीवरून मोबाईलद्वारे जनतेला संबोधित करत मोठ्या घोषणा केल्या

८ कोटींचा निधी फर्दापूर ते सावळदबारा ३३ KV मुख्य विद्युत लाईनसाठी ८ कोटी रुपये मंजूर

७७ नवीन DP ओव्हरलोडच्या समस्येवर तोडगा म्हणून ७७ नवीन डीपींना मंजुरी

पाणीपुरवठ्यासाठी ५० लाख इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्यामुळे फर्दापूर पाणीपुरवठा दुरुस्ती योजनेसाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याचे त्यांनी सांगितले

खोटे श्रेय घेणाऱ्यांना मुलतानींचे खुले आव्हान

सभेत बोलताना इद्रिस मुलतानी यांनी विद्यमान आमदारांवर जोरदार निशाणा साधला. "गेल्या २५ वर्षांत आमदारांनी मतदारसंघाचा काहीच विकास केला नाही. आता जेव्हा आम्ही कामे मंजूर करून आणत आहोत तेव्हा या कामांचे 'खोटे श्रेय' घेण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे हिंमत असेल तर त्यांनी मंजुरीचे पुरावे सादर करावेत कारण मंजुरीच्या प्रस्तावावर कुठेही सत्तार यांचे नाव नाहीअसे जाहीर आव्हान मुलतानी यांनी दिले

मंत्री अतुल सावे तांडा वस्तीच्या विकासासाठी फर्दापूर सर्कलला २ कोटी रुपयांचा निधी देणार

मंत्री मेघनाताई बोर्डीकर जामठी येथे ३३ KV सबस्टेशन लवकरच मंजूर करणार असल्याची जाहीर सभेत घोषणा

मान्यवरांच्या हस्ते फर्दापूर पाणीपुरवठा दुरुस्ती योजना आणि सिमेंट कॉंक्रिट रस्ता व गटार कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ नारळ फोडून करण्यात आला

मान्यवरांची मांदियाळी

या कार्यक्रमाला जि.प. उपाध्यक्ष जितेंद्र बाबा जयस्वाल माजी आमदार सांडू पाटील लोखंडे सुरेश बनकर किशोर आबा पवार ज्ञानेश्वर मोठे सुनील मिरकर माहीम मुलतानी पुष्पाताई काळे सचिन वाघ राधाकृष्ण काकडे विकास कापसे, सभापती उत्तम चव्हाण तालुकाध्यक्ष संजय पाटील उपसभापती भगवान आहेर दिलीप काका दानेकर सुनील गवंडे जयप्रकाश चव्हाण शिवाजी बुडाळ गणेश लोखंडे राजेंद्र जावळे अनिल खरात आत्माराम पाडळे एकनाथ हिवाळे स्वप्निल शिनगारे गणेश भूमकर अरुण काळे मेघराज चोंडीये समाधान बावस्कर जगन गवांडे निसार शेख,अजित पठाण भगवान जाधव संतोष शिंदे अण्णा तांगडे इस्माईल शेख कृष्णा शिरसाट योगेश शिंदे विलास आगळे फिरोज तडवी माजिद्द तडवी समीर तडवी गुलाब तडवी भगवान वाघ आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

# संमिश्र वार्ता



## बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 100 नवीन शाखा स्थापन करणार -आ. डॉ. राहुल पाटील

### शताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

**परभणी :** हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त परभणी जिल्ह्यात शिवसेनेच्या 100 नवीन शाखा 100 आरोग्य शिबिर आणि दहा हजार नागरिकांच्या नेत्र शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत अशी माहिती आ.डॉ. राहुल पाटील यांनी दिली. पुढे बोलताना राहुल पाटील म्हणाले की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमानिमित्त आर पी हॉस्पिटलच्या सभागृहात 23 ऑगस्ट रोजी शिवसेनेची बैठक पार पडणार असून यावेळी डॉक्टर राहुल पाटील बोलत होते व्यासपीठावर जिल्हा संपर्कप्रमुख प्रदीप खोपडे माजी आमदार मीराताई रेंगे पाटील शिवसेना महानगर प्रमुख डॉविवेक नावंदर जिल्हाप्रमुख धर्मेंद्र रवींद्र धर्मे विष्णू मुरकुटे कल्याण रेंगे पाटील राम खरबे पाटील सौ अंबिका डहाळे आधी सह जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती यावेळी बोलताना आमदार डॉक्टर राहुल पाटील म्हणाले की बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्त शिवसेना परभणीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून जिल्हाभरात शिवसेनेच्या पहिल्या टप्प्यात 100 नवीन शाखा शंभर आणि पुन्हा शंभर अशा एकूण 300 शाखाची स्थापना नव्याने होणार आहे त्यासोबत शंभर आरोग्य शिबिर घेऊन नागरिकांना त्यांच्या गावात आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत रुग्णांचे नेत्र तपासणी करून शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत अशी माहिती आमदार डॉक्टर राहुल पाटील यांनी दिली.

80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण या बाळासाहेबांच्या शब्दाला जागून आपण त्यांच्या विचाराचे अनुकरण करायचे आहे त्यांच्यामुळेच एवढे शक्य होईल तेवढे सामाजिक उपक्रम राबवून बाळासाहेब ठाकरे यांना वंदन करावेच आहे असे आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले यावेळी बोलताना जिल्हा संपर्कप्रमुख प्रदीप खोपडे म्हणाली की शिवसेनेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजूट होऊन आपली एकता दाखवावी व सरकारवर संपूर्ण राज्यभरात नाराजी आहे सत्तेत असलेल्या पक्षातील अनेक पदाधिकारी कार्यकर्ते देखील सरकारच्या धोरणावर टीका करू लागली आहेत.

## गोवंशाची कत्तलीसाठी वाहतूक करणारे तिघे पोलिसांच्या ताब्यात; आठ लाखाचा मुद्देमाल जप्त



हिंदू प्रकाश वार्ता./अशोक पवार

**परभणी:-** गेले अनेक दिवसापासून जिंतूर तालुक्यामध्ये गोवंशाची तस्करी करणाऱ्या अनेक तस्करावर पोलिसांनी कार्यवाही करूनही पोलिसांचा पाहिजे तसा धाक तस्करावर निर्माण झाला नाही गोवंशाचे वाहतूक करणारे सोडून म्हणून अशा तस्करांना कायमची शिक्षा देऊन हमेशासाठी बंद केले पाहिजे कत्तलीसाठी निर्दयतेने गोवंशाची वाहतूक करणाऱ्या वर चारठाना पोलिसांनी कारवाई केली आहे.

जिंतूर तालुक्यातील रायखेडा शिवारात दहा बैलांची सुटका करून आयशर वाहनासह एकूण आठ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून याप्रकरणी तिघा जनाविरुद्ध चालताना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 23 ऑगस्ट रविवार रोजी मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास रायखेडा शिवारात तालुका जिंतूर येथे आरोपींनी संगणमत करून दहा गोवंश (बैल) आयशर वाहन क्रमांक एम एच झिरो दोन इआर ६४०५ मध्ये कोबून मोठ्या क्रूरतेने निर्दयी अवस्थेत यावेळी गस्ती रासलेल्या पोलिसांना संशय आल्याने त्यांनी वाहनाची झाडाझडती गेली असता सदरील प्रकार उघडकीस आला पोलिसांनी दहा बैल प्रत्येकी अंदाजे किंमत 40 हजार रुपये याप्रमाणे एकूण चार लाख व एक आयशर वाहन अंदाजे किंमत चार लाख असे एकूण आठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपी रमेश सुरेश गायकवाड व 38 वर्ष राहणार गणेशपुर तालुका वसमत जिल्हा हिंगोली आदेश गौतमराव मस्के वय 24 वर्षे राहणार आंबेडकर नगर वसमत राहणार वसमत यांचे वर साहेब पोलीस उपनिरीक्षक उद्धव लिंबाजी माने यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करणे करून सपोनी बालाजी पुंड यांच्या आदेशाने गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वाघ हे करत आहेत या कारवाईमुळे परिसरातील गुण तस्कराचे धाबे दणाले आहेत

## प्रा. कमलेश काळे यांना पीएच.डी.प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२३ ऑगस्ट :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील प्राध्यापक कमलेश दिलीप काळे यांना JJTU विद्यापीठाकडून हिंदी विषयातील 'कृष्ण बलदेव वैद्य की कहानियों का अनुशिलन' या विषयावरील संशोधनासाठी पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली आहे. प्रा.कमलेश काळे यांनी आपले संशोधन डॉ.धनेश कुमार मिणा व डॉ.सैराज अनवर तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण केले.हिंदी साहित्याच्या क्षेत्रात केलेल्या या संशोधनात्मक कार्यामुळे त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,जिल्हा परिषद सदस्या



पुष्पाताई काळे,शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा ज्योतिताई काळे, प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे, अधीक्षक पंकज साबळे,डॉ. निलेश गावडे,डॉ. निलेश गाडेकर,डॉ. विनोद बारोटे,डॉ. दादासाहेब पवार,डॉ. सुशील जावळे,डॉ. पी.जी गोलहारे,प्रा.अनिल मानकर,शंकर काळे, उदय सोनवणे व राजेंद्र जैस्वार यांनी प्रा.कमलेश काळे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रा.कमलेश काळे यांनी संपादन केलेले हे यश संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील लौकिकात भर घालणारे असून,महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवणारे ठरले आहे.

## 'उमगलेले गांधी' अभिवाचनातून महात्मा गांधींच्या विचारांचा जागर

### रोहिणी हट्टंगडी, चंद्रकांत कुलकर्णी, प्रतिमा जोशी यांचे प्रभावी अभिवाचन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन आणि महात्मा गांधी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिगीषा नाट्यसहवास २०२६' महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी एमजीएम परिसरातील आइनस्टाईन सभागृहात 'उमगलेले गांधी' या विषयावरील अभिवाचनाचा कार्यक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात झाला. ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी आणि दिग्दर्शिका प्रतिमा जोशी यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर आधारित निवडक लेखांचे प्रभावी अभिवाचन





करून गांधींच्या विचारांचा जागर घडविला.

या अभिवाचनात वि. स. वाळिंबे यांचा 'मूठभर मीठ', स. ज. भागवत यांचा 'अखंड जीवनाचे उपासक महात्मा गांधी', सुरेश द्वादशीवार यांचा 'गांधीजी आणि सशस्त्र क्रांतिकारक', श्रीपाद केळकर यांचा 'छोडो भारत घोषणेचा जन्म' तसेच नरहर कुरुंदकर यांचा 'श्री गोळवलकर गुरुजी आणि महात्मा गांधी' या लेखांचा समावेश होता.

कार्यक्रमात कुसुमाग्रजांची 'अखेर कमाई' ही कविता सादर करण्यात आली. 'मध्यरात्र उलटल्यावर, शहरातील पाच पुतळे एका चौथऱ्यावर बसले आणि टिपं गाळू लागले' या आशयातून महापुरुषांच्या विचारांचे जातीय आणि संकुचित चौकटीत होणारे विभाजन अधोरेखित करण्यात आले. गांधींच्या भूमिकेचे भाष्य करताना सादर झालेल्या ओळींनी उपस्थितांना अंतर्मुख केले.

कार्यक्रमाच्या समारोपात बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेतील ओळींमधून गांधींच्या विचारांची आजच्या काळातील गरज अधोरेखित करण्यात आली. अभिवाचनाच्या माध्यमातून गांधींचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे विचार आणि समकालीन समाजातील त्यांचे महत्त्व प्रभावीपणे उलगडले.

या कार्यक्रमाला नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची विशेष उपस्थिती होती. गांधीविचारांचा साहित्य, कला आणि अभिवाचनाच्या माध्यमातून झालेला हा जागर रसिकांसाठी वैचारिक मेजवानी ठरला.

### अवैध दारू विक्री,पत्त्यांचे क्लब व सट्टा-मटका विरोधात पुन्हा तक्रार ;कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

## चिकलठाणा पोलीस ठाण्यात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे निवेदन

**अजिंठा प्रतिनिधी :** सांगवी बायपास परिसरातील पळशी चौफुली येथील हॉटेल कंदुरीसह चिकलठाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कथितरित्या सुरू असलेली अवैध देशी-विदेशी दारू विक्री, तसेच काही ठिकाणी सुरू असल्याचा असलेले पत्त्यांचे क्लब व सट्टा-मटका तात्काळ बंद करण्याची मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात समितीचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष दुर्गादास अशोक अपार यांनी यापूर्वी १० ऑगस्ट २०२६ रोजी चिकलठाणा पोलीस ठाण्यात निवेदन देऊन संबंधित प्रकारांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र, अपेक्षित समाधानकारक कारवाई झाली




नाही असे समितीच्या वतीने सांगितले आहे.

त्यानंतर २१ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, पळशी चौफुली येथील हॉटेल कंदुरीमध्ये कथित अवैध देशी-विदेशी तसेच बनावट दारू विक्री सुरू असल्याची तक्रार नागरिकांकडून समितीकडे प्राप्त झाली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच चिकलठाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काही ठिकाणी पत्त्यांचे क्लब व सट्टा-मटका सुरू असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. अशा प्रकारांमुळे परिसरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने संबंधित ठिकाणी तपासणी करून अवैध प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी समितीने केली आहे.

निवेदनाच्या प्रती राज्य उत्पादन शुल्क विभाग, विभागीय कार्यालय, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिकलठाणा पोलीस ठाणे, अन्न व औषध प्रशासन विभाग तसेच महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाकडे देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, तक्रारीवर तातडीने आणि ठोस कारवाई न झाल्यास ३ सप्टेंबर २०२६ चिकलठाणा पोलीस ठाणे च्या समोर आंदोलन करण्याचा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे. प्रशासनाने या तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित आरोपांची निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी दुर्गादास अशोक अपार यांनी केली आहे.

## पूर्णा तालुका क्रीडा संकुलाचे 24 ऑगस्ट रोजी लोकार्पण

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** पूर्णा तालुका क्रीडा संकुलाचा लोकार्पण सोहळा सोमवारी (ता. २४) सकाळी ११.३० वाजता तालुका क्रीडा संकुल, पूर्णा येथे आयोजित करण्यात आला आहे. पालकमंत्री मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते संकुलाचे लोकार्पण होणार आहे.

कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्षा लता वाकळे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार संजय जाधव, विधान परिषद सदस्य सईद खान शेरगुल खान, आमदार डॉ. राहुल पाटील, आमदार राजेश विटेकर तसेच तालुका क्रीडा संकुल समिती, पूर्णाचे अध्यक्ष व आमदार रत्नाकर गुट्टे उपस्थित राहणार आहेत.

नगराध्यक्ष विमलबाई कदम, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त दीपक सिंगला, छत्रपती संभाजीनगर विभागाचे क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजयकुमार पी. देशपांडे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांचीही उपस्थिती राहणार आहे.

तालुका क्रीडा संकुल समितीचे तहसीलदार तथा कार्याध्यक्ष माधवराव बोथीकर आणि क्रीडा अधिकारी तथा समितीचे सचिव कल्याण पोळे यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## प.पू. राष्ट्रसंत पाचलेगावकर महाराजांची 40 वी पुण्यतिथी साजरी

**जिंतूर (प्रतिनिधी):*** मानवतेचा आणि वारकरी संप्रदायाचा संदेश देणारे प. पू. राष्ट्रसंत पाचलेगावकर महाराज यांची ४० वी पुण्यतिथी रविवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांची जन्मभूमी असलेल्या पाचलेगाव येथे अत्यंत भक्तिभावात आणि उत्साहात साजरी करण्यात आली.

*पालखी मिरवणुकीने गाव दुमदुमले*

सकाळी ९ वाजता श्रींच्या पादुकांची पालखी मिरवणूक सुरू झाली. टाळ-मृदंगाच्या गजरात संपूर्ण गाव भक्तिमय झाले होते. गावातील महिला आणि युवतींनी दारासमोर सुंदर रांगोळ्या काढून पालखीवर फुलांचा वर्षाव केला आणि औक्षण करून पूजन केले.

*काल्याच्या कीर्तनाला भक्त तल्लीन*

सकाळी ११ वाजता प्रसिद्ध कीर्तनकार



श्री ह.भ.प. त्र्यंबक महाराज दस्तापूरकर (श्री ह.भ.प. मारुती महाराज दस्तापूरकर यांचे नातू) यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यांच्या ओघवत्या वाणीतून महाराजांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कीर्तनानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

*रक्तदानातून सामाजिक बांधिलकी*

पुण्यतिथीचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दुपारपर्यंतच १२० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबीर सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होते. महाराजांवर श्रद्धा असणारा मोठा वर्ग असल्याने सकाळपासूनच पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी पाचलेगाव येथे गर्दी केली होती.

या कार्यक्रमास परिसरातील अनेक मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य आणि हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

## मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 30 ऑगस्ट रोजी परभणी दौरा

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

**परभणी:-** मागच्या वेळेस उपमुख्यमंत्री माननीय एकनाथ शिंदे साहेबांचा दौरा रद्द झाल्याने अनेक कार्यकर्ते हिरमुसल्या सारखे झाले होते परंतु परभणीची ही गोम एकनाथ शिंदे साहेबांनी हेरली व कार्यकर्त्यांमध्येजोशआणण्यासाठीवशेतकऱ्यांशीसंवादसाधण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते दिनांक ३० ऑगस्ट रविवार रोजी परभणी येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियम मैदानावर आयोजित शेतकरी संवाद




मेळाव्या संबोधित करणार आहे या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील शेतकरी व्यापारी आणि नागरिकाशी जिल्ह्याच्या विविध विकास कामाचा आढावा व स्थानिक प्रश्नावर चर्चा करणार आहेत अशी माहिती शिवसेनेचे खासदार संजय जाधव यांनी शनिवार रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली परिषदेत शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे विशाल कदम महानगर प्रमुख माणिक पोंढें बालासाहेब पानपट्टी सचिन पाटील काशिनाथ काळबांडे आधीची उपस्थिती होती यावेळी खासदार जाधव म्हणाली की यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा परभणी दौरा सात जुलै रोजी आयोजित करण्यात आला होता परंतु माननीय उपमुख्यमंत्री यांच्या प्रकृती अवस्थामुळे हा दौरा रद्द करावा लागला दिनांक 30 ऑगस्ट रविवार रोजी भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकरी व्यापारी आणि नागरिकाशी उपमुख्यमंत्री संवाद साधणार असून या मेळाव्यात परभणी जिल्ह्यातील विस्तारित औद्योगिक वसाहत ग्रामीण भागातील विविध प्रश्न महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्था भूमिगत गटार योजना विद्यापीठातील क्रीडा संकुल या विविध विकास कामाबाबत चर्चा होणार आहे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण असलेले प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी हा मेळावा महत्त्वाचा ठरणार असून या मेळाव्यास जिल्हाभरातून सुमारे वीस ते पंचवीस हजार नागरिक उपस्थित राहण्याचा अंदाज खासदार संजय जाधव यांनी बोलून दाखवला.

## समर्पण फाउंडेशन तर्फे जि.प.शाळा रामजीनगर येथे शालेय साहित्य वाटप

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२३ ऑगस्ट

समर्पण फाउंडेशन सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना समर्पण फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हर्षल फुसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हस्ते दप्तर,वह्या,पेन व इतर शैक्षणिक साहित्य देण्यात आले.कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष राजू माळी,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कडुबा




सपकाळ,शंकर जेठे,सागर जाधव,सागर इंगळे,नामदेव पेंटर बारी,रघुनाथ इंगळे,शिवाजी कळवत्रे,कृष्णा सोनवणे,हर्षल गोसावी,राहुल ढगे,सुरेश ढगे हे प्रमुख पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले की,ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत व्हावी या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला असून यापुढेही असे सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ काटोले व सहशिक्षक गोपाल चौधरी,विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या वतीने फाउंडेशनच्या सर्व सदस्यांचे आभार मानण्यात आले.

## तळागाळातील समाजापर्यंत पोहोचून प्रभावीपणे काम करा : पांडुरंग हिवाळे

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** स्वयंसेवी संस्थांनी केवळ कागदोपत्री काम न करता समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचून प्रभावीपणे सामाजिक कार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र एनजीओ महासंघटनचे राज्याध्यक्ष पांडुरंग हिवाळे यांनी केले.

महाराष्ट्र एनजीओ महासंघटनच्या वतीने श्री शिवाजी हायस्कूल, खोकडपुरा येथे स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला जिल्ह्यातील सुमारे ६० स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती नोंदविली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महासंघटनचे राज्याध्यक्ष




पांडुरंग हिवाळे होते. अध्यक्षीय भाषणातून त्यांनी स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना सामाजिक कार्याची दिशा, संस्थेची भूमिका आणि तळागाळातील समाजासाठी काम करण्याच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. समाजातील विविध घटकांसाठी काम करण्याची स्वयंसेवी संस्थांना मोठी संधी असून, या संधीचा उपयोग सामाजिक परिवर्तनासाठी करावा, असे त्यांनी सांगितले. तसेच कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR)च्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या संधींचाही संस्थांनी प्रभावीपणे उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

महासंघटनचे राज्य उपाध्यक्ष रामदास वाघमारे यांनी प्रास्ताविकातून स्वयंसेवी संस्थांच्या आवश्यक कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. संस्थेची कागदपत्रे अद्ययावत व व्यवस्थित ठेवणे, आवश्यक नोंदणी तसेच प्रशासकीय बाबी वेळेत पूर्ण करणे याबाबत त्यांनी महत्त्वाची माहिती दिली.

महासंघटनचे राज्य सचिव नंदकिशोर हत्तीआंबिरे यांनी CSR संदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. विविध कंपन्या तसेच शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या सामाजिक विकासाच्या संधी, CSR निधीसाठी संस्थांनी करावयाचे प्रयत्न, आवश्यक प्रक्रिया आणि प्रस्ताव सादरीकरण याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. संस्थांनी आपल्या कामाची गुणवत्ता, पारदर्शकता आणि योग्य कागदपत्रांच्या आधारे CSRच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना मोफत मार्गदर्शन करण्यात आले. संस्थांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य दिशा देणे तसेच राज्यातील NGO क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र एनजीओ महासंघटनच्या माध्यमातून सातत्याने मार्गदर्शनपर उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

महासंघटनचे राज्याध्यक्ष पांडुरंग हिवाळे, राज्य उपाध्यक्ष रामदास वाघमारे आणि राज्य सचिव नंदकिशोर हत्तीआंबिरे यांनी संघटन अधिक मजबूत करण्यासाठी तसेच राज्यभरातील स्वयंसेवी संस्थांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

श्री शिवाजी हायस्कूल, खोकडपुरा येथे झालेली ही कार्यशाळा उत्साहात पार पडली. उपस्थित स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक संदीप ढाकणे यांनी केले, तर प्रशांत जेवरीकर यांनी आभार मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा 68 वा वर्धापनदिन थाटात संपन्न; माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंढे यांना 'जीवनसाधना पुरस्कार' प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन रविवारी (दि. २३) विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि गौरवपूर्ण कार्यक्रमांनी अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मुख्य सोहळ्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सोहळ्यात प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंढे यांना प्रतिष्ठित 'जीवनसाधना पुरस्कारा'ने गौरविण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारती समोरील हिरवळीवर कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते विद्यापीठाचा ध्वज फडकावून या वर्धापन दिन सोहळ्यास अधिकृत सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मुख्य नाट्यगृहात पार पडलेल्या मुख्य सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची सदिच्छा उपस्थिती लाभली. यामध्ये प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप, प्राचार्य डॉ. भारत खंदारे आणि परीक्षा मंडळ संचालक डॉ. बी. एन. डोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सोहळ्याच्या प्रास्ताविकातून प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांनी विद्यापीठाच्या ६८ वर्षांच्या गौरवशाली प्रगतीचा विस्तृत आढावा घेतला. डॉ. वैशाली बोदले यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. संजय शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.




या सोहळ्यात कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या संकल्पनेतून शैक्षणिक व प्रशासनिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना, प्राचार्यांना आणि कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाईचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार मिळाला. तसेच श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटीचे डॉ. रामकृष्ण हरिदास कदम आणि विद्यापीठ शिक्षक डॉ. मच्छिंद्र लांडे यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाविद्यालयीन प्रशासकीय श्रेणीत डॉ. दर्शना गांधी-जोशी आणि डॉ. अनिता पाटील यांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराने गौरवण्यात आले. याचसोबत, वर्धापनदिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या दिवंगत शिक्षक आमदार वसंतराव काळे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारासाठी कन्नड येथील शिवाजी महाविद्यालय आणि जालना येथील व्ही.एस.एस. महाविद्यालय यांची निवड करण्यात आली असून, अनुक्रमे प्राचार्य डॉ. विजय भोसले व प्राचार्य डॉ. प्रसाद मदन यांनी हे पुरस्कार स्वीकारले. मार्च आणि एप्रिल २०२६ परीक्षेतील १७ गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थी विकास मंडळातर्फे आयोजित राजर्षी शाहू महाराज वक्तृत्व स्पर्धा तसेच अँटी रॅगिंग सप्ताहनिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या विजेत्यांना यावेळी प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. परीक्षा मंडळ संचालक डॉ. बी. एन. डोळे यांनी पारितोषिकांचे वाचन केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी विद्यापीठाशी असलेल्या आपल्या भावनिक संबंधांना उजाळा दिला. प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या ज्ञानभूमीने खेड्यापाड्यातून आलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे समग्र जीवन घडवले असल्याचे सांगत, माझ्यासारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला कुलगुरू पदापर्यंत पोहोचवल्याबद्दल त्यांनी विद्यापीठाविषयी कृतज्ञता व्यक्त केली. ज्ञानाचे रूपांतर संपत्तीत करण्यात शिक्षण क्षेत्राचे मोठे योगदान असून देशाला महासत्ता करण्यासाठी सर्वांनी मिळून नेटाने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

जीवनसाधना पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंढे यांनी आपले विचार मांडले. डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, अधिकारी असो की राजकारणी कोणतेही क्षेत्र श्रेष्ठ-कनिष्ठ नसते, तर कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिकपणे काम करून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणारी प्रत्येक व्यक्ती श्रेष्ठच असते, असे प्रतिपादन त्यांनी केले. विद्यापीठाचा विद्यार्थी ते प्रभारी कुलगुरू आणि आता ज्ञानसाधना पुरस्कारार्थी अशी आपल्या ५० वर्षांच्या प्रवासाचा आढावा त्यांनी फ्लॅशबॅक पद्धतीने घेतला. अंबाजोगाईतून त्यावेळच्या औरंगाबादला (आजचे छत्रपती संभाजीनगर) येताना अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या गाडीतून प्रवास झाल्याची भावना असल्याचे सांगत, खेड्यापाड्यातील सर्वसामान्य माणसांच्या सहकार्याने प्रशासनात खूप काही करता आल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात बोलताना कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी व्यवस्था सुधारण्याच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. कोणता हा आजार नीट करायचा असेल तर गोळी खावीच लागते, मात्र चघळत बसले की गोळी कडूच लागते, असे सांगत आपणही व्यवस्था नीट करण्यासाठी वेळप्रसंगी योग्य ती कडक पावले उचलल्याचे स्पष्ट केले. आता या व्यवस्थेत सकारात्मक सुधारणा होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. गेल्या ६८ वर्षांत विद्यापीठाने प्रगतीची अनेक शिखरे गाठल्याचे सांगत, नॅकचे 'ए प्लस' मानांकन प्राप्त असलेले आणि 'फर्स्ट जनरेशन ग्रॅज्युएट्स' घडविणारे आपले विद्यापीठ अत्यंत कमी शुल्कात दर्जेदार शिक्षण देत असल्याचा पुनरुच्चार कुलगुरूंनी केला.

## 'वाल्मी'त 20 अनुकंपाधारक उमेदवारांना मिळाली नियुक्ती; अजय येडे-पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** 'वाल्मी' म्हणजेच जल आणि भूमी व्यवस्थापन संथेमध्ये प्रदीर्घ काळ रखडलेली अनुकंपा भरती प्रक्रिया अखेर मार्गी लागली असून, २० अनुकंपाधारक उमेदवारांना नियुक्ती मिळाल्यामुळे २० कुटुंबांचा रोजीरोटीचा प्रश्न सुटून त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सहायक प्रशासकीय अधिकारी अजय येडे-पाटील यांनी दीर्घकाळ प्रलंबित अशा या भरती प्रक्रियेला गती देवून प्रश्न सोडविल्यामुळे वाल्मीत रुजू झालेल्या उमेदवारांनी आनंद व्यक्त केला आहे.

जलसंधारण दिनाच्या औचित्याने आयोजित कार्यक्रमात 'वाल्मी' चे महासंचालक सुनील कुशीरे यांच्या हस्ते २० अनुकंपा उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. संस्थेच्या प्रशासकीय विभागाने महासंचालक कुशीरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पूर्ण केली. अनुकंपा नियुक्तीसाठी अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांपैकी अनेकजण उच्चशिक्षित असूनही, कुटुंबातील कर्त्या व्यक्तीला गमावल्यानंतर आर्थिक विवंचनेमुळे भाजीपाला विक्री, मिस्त्री काम तसेच विविध मोलमजुरीची कामे करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. त्यामुळे नियुक्तीपत्र मिळाल्याचा क्षण अनेक उमेदवार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी अत्यंत भावनिक आणि हर्षाचा ठरला.

या विशेष कामगिरीची दखल घेत जलसंधारण दिनाच्या अनुषंगाने संस्थेचे महासंचालक सुनील कुशीरे आणि संस्थेचे अधीक्षक अभियंता तथा सहसंचालक सुभाष कापगते यांच्या हस्ते सहायक प्रशासकीय अधिकारी येडे-पाटील यांचा पुष्पगुच्छ, शाल-श्रीफळ आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

अनेक वर्षांपासून नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या २० उमेदवारांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी अजय येडेपाटील यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे या प्रक्रियेला

## एमएच-सीईटी लॉच्या मागण्यांवर शासनाची सकारात्मक कार्यवाही

### युवा प्रतिनिधी निखिल काकडे यांच्या मागणीला यश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** एमएच-सीईटी लॉच्या कॅप राउंड प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करून त्यांना स्पष्टता आणि योग्य संधी मिळावी, यासाठी युवा प्रतिनिधी निखिल काकडे यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे सादर केलेल्या निवेदनाची शासनाने सकारात्मक दखल घेतली आहे. प्रवेश प्रक्रियेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात आल्याची माहिती काकडे यांनी दिली.

गव्हर्नमेंट लॉ कॉलेज (जीएलसी), केसी लॉ कॉलेजसह संबंधित विधी महाविद्यालयांची कॅप राउंड प्रक्रियेतील सद्यस्थिती विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट करावी, अशी मागणी निखिल काकडे यांनी केली होती. प्रशासकीय अथवा मान्यता प्रक्रियेला विलंब झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी योग्य उपाययोजना करण्याचे आवाहनही त्यांनी केले. पात्र महाविद्यालयांचा नंतर कॅप राउंडमध्ये समावेश झाल्यास विद्यार्थ्यांना पसंतीक्रम बदलण्याची पुरेशी संधी द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली होती. तसेच प्रवेश प्रक्रियेतील अडचणी सोडविण्यासाठी सीईटी सेलमार्फत स्वतंत्र हेल्पडेस्क आणि तक्रार निवारण यंत्रणा सुरू करावी, अशी मागणीही करण्यात आली.



प्रवेश प्रक्रियेतील महत्त्वाचे निर्णय आणि बदल अधिकृत माहिती प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना वेळेत उपलब्ध करून द्यावेत, यावरही काकडे यांनी भर दिला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी संबंधित प्रश्न योग्य पद्धतीने शासनापर्यंत पोहोचविणे हा या निवेदनामागील उद्देश होता. शासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याचे स्वागत असल्याचे काकडे यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी काकडे यांच्यासोबत आविष्कार कुलकर्णी, सुजल शिंदे, ऋग्वेद देशमुख, पार्थ वाघमोडे, अधिराज लोंढे, आर्यन केंचे, सार्थक शिंदे आणि अभिषेक आडे आदी पदाधिकाऱ्यांनी विशेष भूमिका बजावली.

**युवासेना ॲडमिशन हेल्पडेस्ककडून मोठी मदत**

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, युवा सेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, मराठवाडा सचिव निलेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली

महाराष्ट्रातील शेकडो विधी महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया सुरू असताना युवासेना ॲडमिशन हेल्पडेस्कच्या मदत होत आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध स्तरांवर मार्गदर्शन करण्यात आले असून अर्ज भरणे, आवश्यक कागदपत्रे, महाविद्यालयांची निवड तसेच कॅप राउंड प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यात आल्या. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुलभ झाली. मुंबईत शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची अडचण लक्षात घेऊन पीजी हेल्पडेस्कही सुरू करण्यात आला. यामाध्यमातून विद्यार्थ्यांना सोयीस्कर आणि परवडणाऱ्या पीजीची माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## कुष्ठरोग शोध व उपचार मोहिमेला जिल्ह्यात प्रभावी प्रतिसाद

### 340 संशयितांची तपासणी; 45 रुग्ण उपचाराखाली

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कुष्ठरोग शोध व उपचार मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सहाय्यक संचालक, कुष्ठरोग डॉ. शिवकुमार हलकुडे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण तसेच शहरी भागात नागरिकांची तपासणी करून संशयित रुग्णांचा शोध घेतला जात आहे.

या महिन्यातील अभियानात कुष्ठरोगाचे लवकर निदान, उपचार आणि जनजागृतीवर विशेष भर देण्यात आला आहे. आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी तसेच कुष्ठरोग विभागातील कर्मचारी यांच्या संयुक्त सहभागातून नागरिकांची तपासणी केली जात असून, गावपातळीवर कुष्ठरोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर निदान आणि नियमित उपचाराचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

कुष्ठरोगाबाबत नागरिकांमध्ये असलेले गैरसमज व भीती दूर करण्यासाठी आरोग्य विभागाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. संशयित व्यक्तींनी कोणतीही लाज किंवा भीती न बाळगता तपासणी करून घ्यावी, असे आवाहनही करण्यात येत आहे.

दि. २२ ऑगस्ट २०२६ पर्यंत जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात एकूण ३४० संशयित व्यक्तींची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४५ कुष्ठरोग रुग्ण आढळून आले असून त्यांना उपचाराखाली आणण्यात आले आहे. यामध्ये शहरी भागातील ४, तर ग्रामीण भागातील ४१ रुग्णांचा समावेश आहे. निदान झालेल्या रुग्णांना नियमित उपचार, पुढील तपासणी आणि आवश्यक आरोग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येत आहे.

कन्नड, सोयगाव आणि पैठण तालुक्यांमध्ये या मोहिमेला विशेष स्वरूप देण्यात आले आहे. आरोग्य कर्मचारी व कुष्ठरोग विभागाचे कर्मचारी नागरिकांपर्यंत पोहोचून संभाव्य रुग्णांचा शोध घेत आहेत. आढळून आलेल्या रुग्णांना तातडीने आवश्यक उपचार व आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

कुष्ठरोगाचे लवकर निदान करून योग्य उपचार घेतल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्यामुळे शरीरावर संवेदना कमी झालेला डाग, त्वचेवर संशयास्पद चट्टे किंवा कुष्ठरोगाशी संबंधित लक्षणे आढळल्यास नागरिकांनी तातडीने जवळच्या शासकीय आरोग्य केंद्राशी संपर्क साधून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

'लवकर निदान – नियमित उपचार – कुष्ठरोगमुक्त समाज' या उद्देशाने जिल्ह्यातील कुष्ठरोग शोध व उपचार मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

## रांजणगाव पोळच्या शाळेत एच जी फाउंडेशनतर्फे आरओ प्लांट

### विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध पिण्याचे पाणी; ग्रामस्थांकडून स्वागत

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**रांजणगाव पोळ :** रांजणगाव पोळ येथील लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने एच जी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत (सीएसआर) आरओ प्लांटची उभारणी करण्यात आली. या आरओ प्लांटचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले.

संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे व्यवस्थापक हरीशलालकोट सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. प्रकल्प समन्वयक सचिन लिमकर, सचिन डहाळे, शाहिस्ता शेख, वर्षा कापसे आणि देवयानी कापसे यांनी कार्यक्रमाच्या नियोजन व आयोजनासाठी विशेष योगदान दिले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करणे आणि शाळेतील आरोग्यदायी वातावरणाला चालना देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांसह शिक्षक व शालेय कर्मचाऱ्यांनाही शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.

उद्घाटनप्रसंगी एच जी इन्फ्राच्या वतीने सुरक्षा अधिकारी वीरेंद्र सर आणि लोकेश सर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील विविध मान्यवरांची उपस्थिती होती. रांजणगाव पोळचे सरपंच राजू काका कुराडे आणि पोटुळ ग्रामपंचायतीचे सरपंच दादाभाऊ कापसे यांची विशेष उपस्थिती लाभली.

## प्रत्येकाने येणारी रक्षाबंधन हे गोमय राखीचा उपयोग करावा : नितीन जाधव

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**-गौरक्षक सेना -कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी च्या वतीने गाईच्या शेण गोमूत्र पासून बनवलेल्या विविध गो उत्पादन गो विक्रेते व खरेदी कार गोउद्योजक गो व्यवसाय गोमहाजन जागृती अभियान म्हणून प्रत्येक नागरिकांनी येणारे रक्षाबंधन हे इतर राख्या न घेता आपल्या बहिण भावाला रक्षाबंधनच्या सणासाठी भारत महाराष्ट्र सरकारने राज्य माता गोमाता दर्जा दिलेला आहे या दर्जाचा कुठेतरी उपयोग व्हायला पाहिजे म्हणून आपण प्रत्येक जिल्ह्यातल्या गोशाळा गोरक्ष गोपालकांना न्याय मिळाला पाहिजे व उद्योजकांना न्याय



मिळाला पाहिजे.

म्हणून गाय वाचली पाहिजे ही आपली हिंदू संस्कृती टिकली पाहिजे म्हणून गोमातेच्या दूध दही ताक तूप शेण गोमूत्रापासून बनवलेल्या एकदम पर्यावरणपूर्वक आयुर्वेदिक राखी आपल्या भावाला बांधायला पाहिजे अशी संकल्पना प्रत्येक बहिणीने घेतली पाहिजे की गोमय राखी उपयोग येणारा रक्षाबंधन साजरा करणारा जास्त जास्त नागरिकांनी आपल्या परिसरातील प्रत्येक गोशाळा किंवा उत्पादन विक्रेते वाल्याची संपर्क साधून गोमय राखीचा उपयोग घ्या आणि उपयोग करा गो सन्मान रक्षाबंधन गोमय राखी साजरी संकल्पना पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजाताई मुंडे आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग राज्यमंत्री दर्जा अध्यक्ष शेखरजी मुंदडा यांच्या पुढाकारातून संवाद यात्रा मुख्य सारथी नितीन चिलवंत यांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून प्रत्येक भाविक भक्तांनी रक्षाबंधन गोमय रक्षाबंधन गोमय राखी पौर्णिमा साजरी करण्याची संकल्पना करा असे आव्हान गौरक्षक सेना प्रदेश मंत्री गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्वांना आवाहन केले आहे.

## जळगाव फेरण येथे 14 हजार वृक्ष लागवड

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद अंतर्गत महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन, स्टरलाईट टेक्नॉलॉजी लिमिटेड व ग्रामपंचायत जळगाव फेरण यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव फेरण, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक 22 ऑगस्ट २०२६ रोजी १४ हजार वृक्ष लागवड करण्यात आली.

जिल्हा परिषद अंतर्गत महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन व स्टरलाईट टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर व गंगापूर तालुक्यातील ५२ गावांमध्ये 'समुदाय संस्था बळकटीकरणातून जल व पर्यावरण समृद्ध गावे' हा जल व पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून जलसंधारण, वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन तसेच समुदाय संस्थांच्या बळकटीकरणावर विशेष भर देण्यात येत आहे.



छत्रपती संभाजीनगर तालुक्यात सन २०२१ ते २०२६ या कालावधीत विविध ग्रामपंचायतींच्या माध्यमातून सुमारे ४ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली असून, या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्यात येत आहे. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने विविध ठिकाणी शहरी घनवन विकसित करण्यात आले आहेत.

जलसंधारणाच्या क्षेत्रात रेन वॉटर हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण आणि रिचार्ज शाफ्ट यांसारखी महत्त्वपूर्ण कामे करण्यात आली आहेत. या कामांमुळे पाण्याचे पुनर्भरण होऊन भूजल पातळीत वाढ होण्यास मदत झाली असून, त्याचा लाभ विविध गावांतील नागरिक व लाभार्थींना होत आहे.

जळगाव फेरण येथे सुरू करण्यात आलेल्या १४ हजार वृक्ष लागवड उपक्रमामुळे गावातील हरित क्षेत्र वाढण्यासोबतच जैवविविधतेचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे. वृक्ष लागवडीपूर्वी गावातून शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांच्या सहभागातून वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षदिंडीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन व वृक्ष लागवडीबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली.

वृक्ष लागवड शुभारंभ कार्यक्रमास गट विकास अधिकारी श्री शिवाजी साळूंके,पंचायत समिती सदस्य श्री. शंकर पाटील ठोंबरे, जळगाव फेरणचे सरपंच श्री. संदीप शेळके, उपसरपंच श्री. सदाशिव गायके, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती व्ही. के. सोनावणे, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक सतीश खंदारे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कार्यरत जलदूत अमोल कुटे, महेश तळेकर, बाळू कोळगे व रवींद्र वाघमोडे यांचीही उपस्थिती होती.

ग्रामस्थ, विद्यार्थी व युवकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे वृक्ष लागवड कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले. या उपक्रमातून जळगाव फेरण गावाच्या पर्यावरणीय समृद्धीसोबतच आगामी काळात हरित व शाश्वत गाव निर्मितीस चालना मिळणार आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंट्स, सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911